# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

'ज्ञानगंगोत्री', गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक -४२२२२२

ज्ञानगंगा घरोघरी

क्रमांक.:यचममुवि/कुका-११/२०२०/८७

दिनांक : १७/०३/२०२०

## परिपत्रक

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-19) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत..**

**संदर्भ :** (1) **उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-2020/प्र.क्र.60/20)तांशि-1 दि.** 16 **मार्च** 2020 **चे पत्र**
(2) **शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे उशिस/कोरोना/मवि-1/2020/3819 दि.** 16 **मार्च** 2020 **चे पत्र**
(3) **विद्यापीठाचे परिपत्रक क्र. यचममुवि/कुका-11/2020/80 दि.** 16 **मार्च,** 2020

उपरोक्त विषय व संदर्भाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

(1) विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमांच्या लेखी, प्रात्यक्षिक, तोंडी, प्रोजेक्ट परीक्षा दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत स्थगित करण्यात येत आहेत. नवीन तारखा परीक्षा विभागाकडून जाहिर करण्यात येतील.

(2) विद्यापीठांतर्गत असलेली विविध शिक्षणक्रमांची अभ्यास केंद्रे तसेच विभागीय केंद्रे येथील अध्यापनाचे काम दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत बंद राहील.

(3) विद्यापीठातील सर्व अध्यापक दिनांक 25 मार्च 2020 पर्यंत घरी राहून कामकाज करू शकतील. तथापि आवश्यकता भासल्यास त्यांना तातडीने विद्यापीठात हजर रहाणे आवश्यक राहील.

(4) विद्यापीठातील सर्व शैक्षणिक सहयोगी दिनांक 25 मार्च 2020 पर्यंत घरी राहून कामकाज करू शकतील. तथापि आवश्यकता भासल्यास त्यांना तातडीने विद्यापीठात हजर रहाणे आवश्यक राहील.

(5) विद्यापीठातील आय.टी.आय. प्रशिक्षणार्थी, पी.एच.डी. विद्यार्थी व सर्व विद्यार्थी यांना दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत सुट्टी देण्यात येत आहे.

(6) विभागीय केंद्रे व विद्यापीठातील सर्व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहवे.

आवश्यकतेनुसार शासनाकडून येणाऱ्या सूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील.

(डॉ. दिनेश भोंडे)
कुलसचिव

प्रत : (1) मा.कुलगुरू यांचे कार्यालय
(2) परीक्षा नियंत्रक – मुद्दा क्र. (1) नुसार कार्यवाही करावी.
(3) विद्यापीठ संकेतस्थळ

प्रति,
सर्व विद्याशाखा/विभाग/केंद्र/कक्ष प्रमुख व विभागीय केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.